

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197(IIJIF)
(UGC Approved Journal No. 63716)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 4 NO. 1 JAN. 2018 BOOK VI
A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

SPECIAL ISSUE
On the Occasion of One Day National Conference On

## WOMEN EMPOWERMENT IN INDIA

27th January, 2018



*Editor*
**Dr. Namanand G. Sathe**

*Principal*
**Dr. A. D. Mohekar**

ORGANIZED BY
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
DNYAN PRASARAK MANDAL'S
SHIKSHAN MAHARSHI DNYANDEO MOHEKAR MAHAVIDYALAYA,
KALAMB. DIST. OSMANABAD

Scanned with CamScanner

ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

# CONTENTS


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | महिलांचा राजकारणातील सहभाग | प्राचार्य व्ही.जी. गुंडरे(रेड्डी)<br>प्रा.सचिन राजाभाऊ डहाळे | 07 |
| 2. | 'महिला सबलीकरण साठी भारत सरकारचे प्रयत्न' | प्रा.आर. एन. निगडे | 09 |
| 3. | स्थानिक स्वराज्य संस्थामधील महिलांचा सहभाग | प्रा. एन.ए.पाटील | 11 |
| 4. | स्त्रीवाद : स्त्रीउध्दाराचा विचार व स्त्रीसबलीकरणाची चळवळ | डॉ. सय्यद आर.जे. | 14 |
| 5. | महिला सबलीकरण व भारत | डॉ. आर. बी. शेजूळ | 19 |
| 6. | पक्षीय राजकारणात महिलांचासहभाग | प्रा.डॉ.अधाव एन. बी. | 22 |
| 7. | स्थानिक स्वराज्य संस्थामधील महिला नेतृत्व एक चिकित्सक अभ्यास | डॉ.सुनिल चकवे | 25 |
| 8. | महिला सबलिकरण | प्रा.चावरे एम. व्ही. | 27 |
| 9. | महिला सबलीकरणाची साधनं | डॉ. नामानंद गौतम साठे | 29 |
| 10. | स्त्रियासाठी भारतीय संविधानातील तरतूदी व स्त्रिवादाचे स्वरूप | बिराजदार अबादारा | 31 |
| 11. | महिला सबलीकरण आणि भारतीय संविधान | प्रा.डॉ.बिडवे टी.एस | 34 |
| 12. | महिला सक्षमीकरण आणि राजकारण | डॉ.भुजंग पाटील | 36 |
| 13. | स्त्रीवाद : अर्थ, स्वरुप, विकास व प्रकार | डॉ. जगदीश देशमुख | 39 |
| 14. | महिला सबलीकरण संकल्पना व स्वरूप | डॉ. अनिल दत्तू देशमुख | 43 |
| 15. | Women Empowerment: Meaning, Concept … | Archana K.Chavare | 46 |
| 16. | महिला सबलीकरणासाठी भारतात व महाराष्ट्रात झालेले प्रयत्न | डॉ. विलास नारायण ढाले.<br>डॉ. दिनकर कळंबे | 48 |
| 17. | स्त्रीवाद - अर्थ, स्वरुप, विकास प्रकार | डॉ. दिनेश रा. हंगे | 51 |
| 18. | Empowerment of Women Political Participation in India | Dr. Vivek M. Diwan | 53 |
| 19. | सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत महिलांसाठी राबविल्या जाणाऱ्या …. | डॉ.आमले एस.एस. | 57 |
| 20. | स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला सक्षमीकरण | प्रा.रासवे दिनकर सुदामराव | 60 |
| 21. | डॉ.शंकर शेष के नाटकों में चित्रित 'स्त्री' चरित्र | प्रा.संजय व्यंकटराव जोशी | 62 |
| 22. | नेतृत्वाच्या माध्यमातुन महिला सक्षलिकरण | प्रा.सय्यद आर. आर. | 65 |
| 23. | Mass Media and Women | Rajesh K. Gaikwad | 67 |
| 24. | भारतीय महिला आणि आरक्षण | डॉ.राम प्र.ताटे<br>प्रा.अर्चना शिवाजी वाघमारे | 69 |
| 25. | पचायतराज व्यवस्था आणि महिला सबलीकरण | डॉ. रमाकांत तिडके | 71 |
| 26. | महिला सबलीकरणासाठी भारतात झालेले प्रयत्न | डॉ. आर.के. काळे | 73 |
| 27. | स्त्रीवाद : अर्थ. विकास व प्रकार | क्षीरसागर दिलीपकुमार | 76 |
| 28. | तत्कालीन समाजजीवनाचे दाहक वास्तव :मुक्ता साळवे यांचा निबंध | डॉ.सुशीलप्रकाश चिमोरे | 79 |
| 29. | महिला सबलीकरण आणि सामाजिक बदल. | प्रा. आर. ई. भारूडकर | 83 |
| 30. | Woman Empowerment in Rama Mehta's *Inside the Haveli* | Dr. Milind Mane | 86 |
| 31. | Political Participation And Representation Of Women … | Dr. Mohan Chougule | 88 |
| 32. | राजकीय नेतृत्व व महिला सक्षमीकरण | प्रा. मोरे चंद्रकांत | 91 |
| 33. | Women's Empowerment And Political Participation | Shaikh G. A. | 94 |
| 34. | भारतीय राजकारणात महिलांचा सहभाग आणि भूमिका | प्रा.महादेव रावसाहेब मुंडे | 98 |
| 35. | स्त्रीवाद : अर्थ, स्वरूप व विकास | डॉ. पंडित महादेव लावंड | 102 |
| 36. | Women Empowerment in India | Dr.P.W.Patil | 106 |
| 37. | Women Empowerment — Challenges | Pradeep Ingole | 108 |
| 38. | महाराष्ट्राच्या राजकारणातील महिलांचा सक्रीय सहभागाचा … | डॉ.कदम एच.पी. | 110 |
| 39. | स्त्री–सशक्तीकरण' की अवधारणा का सम्यक अध्ययन … | डॉ विनोदकुमार | 112 |
| 40. | महिला सबलीकरणात शासनाची भुमिका - एक दृष्टिक्षेप | प्रा.किरण कि. येरावार | 116 |




Scanned with CamScanner

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

# 26.
# महिला सबलीकरणासाठी भारतात झालेले प्रयत्न

**डॉ. आर.के. काळे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
बलभीम महाविद्यालय, बीड

**प्रस्तावना -** प्राचीन काळापासुन महिलांना समाजामध्ये दुय्यम स्थान देण्यात आले आहे. आधुनिक काळामध्ये जरीही महिलांच्या विकासासाठी प्रयत्न होत असले, तरीही त्यात म्हणावे तसे यश मिळत नाही. महिलांची जी उपेक्षा केली जाते, तीच्या कष्टाची गुणांची जी नींदा केली जाते, तीला समाजात जे दुय्यम स्थान दिले जाते. त्या सर्वांचे मुळ कारण आर्थीक आहे. जरस्त्री आर्थीक दृष्ट्या सक्षम झाली, तर्तीची उपेक्षाहोणार नाही व तीला मान सन्मान मिळुन एक दर्जा प्राप्त होईल. आपल्या अधिकारांची व अस्मीतेची लढाई स्वत:च लढली पाहीजे याची जाणीव २१ व्या शतकातील महिलांना झाली आहे. १९४७ च्या महिलांपेक्षा आजच्या महिलांच्या जीवनात खुप परीवर्तन झाले आहे. हे परीवर्तन केवळ शहरी भागातच नव्हे, तर ग्रामीण भागातही दिसुन येत आहे. ग्रामीण भागात देखील महिला उद्योग व्यवसायाची कर्जाच्या सोयीची माहिती घेत आहेत. खास करुन लघू, ग्रामीण, कुटीरतसेच अती लघु क्षेत्रातील उद्योगात बांगड्या भरलेले हात पुढे येत आहेत. ग्रामीण महिला स्वच्छेने सामाजिक, आर्थीक कार्यात सहभागी होत आहेत. म्हणजेच महिला सर्वच बाबतीत सक्षम होत आहेत.

भारताला स्वातंत्र्य मिळुन ६६ वर्षे पूर्ण झाली आहेत. तथापि स्वातंत्र्याचे फायदे भारतीय समाजातील महिलासारखा एक मोठा घटक अद्यापही पूर्णपणे अपभोगू शकत नाही. महिलांच्यासंरक्षणासाठी, त्यांच्या सबलीकरणासाठी राष्ट्र आणि राज्य पातळीवर अनेक कायदे करण्यात आले. पण महिला अधिकार उल्लंघनाच्या घटना वाढतच आहे. लिंगभेदावर आधारित विषमतेला, शोषणाला त्याना तोंड द्यावेच लागते आहे. परिणामी महिलांच्या प्रश्नविषयी अधिक सवेंदनशीलतेने विचार होण्याची गरत आहे. स्त्रियांचे प्रश्न काय आहेत, त्यांच्या मुख्य मागण्या कोणत्या आहेत. आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय पातळीवर या मागण्यांच्या पूर्ततेसाठी कोणती पाऊले उचलली गेली आहेत. या सर्व बाबींचा विचार करणे क्रमप्राप्तठरते.

**महिलासक्षमीकरणसंकल्पना :** महिलांच्या संदर्भात सक्षमीकरणहा शब्द खऱ्या अर्थाने सन १९६५ पासुन महिला मुक्ती चळवळीमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चीला जात आहे. त्यामुळेच सन १९६५ मध्ये नैरोबी येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेमध्ये महिलांना पुरुषाबरोबर कायदेशीर, राजकीय, सामाजिक, आर्थिक, व त्यांच्या कुटूंबात, समुदाय आणि राष्ट्राच्या सांस्कृतीक पार्श्वभूमीमध्ये निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य व स्वायत्तता दिली जावी अशी घोषणा करण्यात आली. जगातील, सर्व समाजातील महिला- पुरूष भेदभाव कमी करण्याचे साधन या रुपात महिलासक्षमीकरणाला पाहिले जाते. ``महिलांच्या मनात आत्मविश्वास, अधिकारांप्रती, जागृती, अन्यायाशी लढण्याचीताकद निर्माण करणे, जेणे करुन आपल्यावर होणाऱ्या आर्थीक, सामाजिकतसेच पारंपारिक भेदभावांना ओळखून त्यांचा प्रतिकार करेल अशी महिलातयार करणे म्हणजे महिलासक्षमीकरणहोय.``

महिलासक्षमीकरण प्रक्रीया पुढीलतीन पातळ्यानुसार चालते.

**महिलासक्षमीकरण**

- वैयक्तीक गुणवत्तेत सुधार
- आत्मविश्वास संपादन करणे
- सक्षमीकरणासाठी समुहवादी भूमिका

**भारतात महिला सबलीकरणासाठी झालेले प्रयत्न :**

(१) **महिलांच्या रक्षणासाठी भारतीय दंड विधानातील तरतुदी -** भारतीय दंडविधानामध्ये बलात्कार, विनयभंग, हुंडा मागणे, हुंडाबळी, स्त्रीच्या समर्तीशिवाय गर्भपात, पत्नीला मारहाण, स्त्रीचे अपहरण करणे, अल्पवयीन मुलीला वेश्या व्यवसायासाठी विकणे आदी गुन्ह्यांसाठी कडक शिक्षेचीतरतुद करण्यात आली आहे. दोन वर्षापासुन तर दहा वर्षापर्यंत कैद आणि पाचशे रुपायांपासुन दहाहजार रुपयांपर्यंतच्या दंडाचीतरतुद या गुन्ह्यांसाठी करण्यात आली आहे.

(२) **सतीबंदी कायदा :- १९८७** सन १९८७ साली क्रांतिकारी सतीबंदी कायदा लोकसभेत मंजूर करण्यात आला. या कायद्यानुसार एखाद्या विधवेला पतीबरोबर किंवा इतर कोणत्याही नातेवाईकाच्या शरीराबरोबर अथवा वस्तुबरोबर जाळण्याचा प्रयत्न केल्या गेल्यास दोषी व्यक्तींना जन्मठेपेच्या शिक्षेचीतरतुद करण्यात आली. तसेच विधवेला सती जाण्यास भाग पाडणाऱ्यांना लोकप्रतिनिधी म्हणुन अपात्र ठरविण्यात आले.

(३) **प्रसूती काळातहकाची रजा -** प्रसूती काळामध्ये स्त्रियाना हक्काची रजा मिळण्याचीतरतुद मातृत्व हितरक्षण कायदा १९६१ मध्ये करण्यात आली आहे.



Scanned with CamScanner